
सा विद्या या विमुक्तये

# आयडियल एज्युकेशन सोसायटीचे

# युनियन हायस्कूल



# सुवर्ण महोत्सवी वर्ष

५० १९३२ - १९८२ ५०

# आम्ही आपले आभारी आहोत.

मित्रहो,

दिनांक १२ व १३ जानेवारी रोजी आमच्या शाळेचा सुवर्ण महोत्सव मोठ्या दिमाखात साजरा झाला. त्याचे इतिवृत्त अन्यत्र छापलेले आहेच. तेव्हा अत्यंत संतुष्ट मनाने ही स्मरणिका आपल्या हाती देताना मला अत्यंत आनंद होत आहे. १९८१ चे शालेय वर्ष सुरू होताच सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचे विचार आमच्या मनात घोळत होते. १९८१ च्या सप्टेंबरमध्ये काहीशा कातर मनाने आम्ही सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचा संकल्प सोडला. काहीशा कातर मनाने असं म्हटलं, कारण या आमच्या कल्पनेला माजी विद्यार्थ्यांकडून कितपत प्रतिसाद मिळेल, याची नीटशी कल्पना आम्हाला त्यावेळी नव्हती. शाळेचे भूतपूर्व मुख्याध्यापक मा. वा. रा. पाटणकर व मा. के. ना. कोल्हटकर यांचा आमच्या या कल्पनेला उत्साही पाठिंबा मिळाला. आणि आम्ही प्राथमिक तयारीला लागलो. दि. ४–१०–८१ रोजी बोलाविलेल्या सभेला जेव्हा दोनशेहून अधिक विद्यार्थी उपस्थित राहिले तेव्हा मनाची कातरता लोप पावली आणि आम्हाला काहीसा धीर आला. तरीसुद्धा आशंका होतीच. 'आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः ।' या म्हणीप्रमाणे हे आरंभीचं शौर्य तर नसेल ना ? पण दुसऱ्या सभेला सुद्धा मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित झालेले पाहून खात्री पटली. माजी विद्यार्थ्यांकडून अनेक कल्पना सुचविण्यात आल्या, मदतीची आणि सहकार्याची भरघोस आश्वासनं मिळाली, आणि सुवर्ण महोत्सवाची कल्पना मूर्त स्वरुपात आकारू लागली. पण गेल्या पन्नास वर्षातले आमचे हजारो विद्यार्थी इतस्ततः पसरलेले, त्या सर्वांशी संपर्क कसा साधायचा ? हा यक्षप्रश्न आमच्यापुढे उभा राहिला. पण सुदैवाने खूपशा माजी विद्यार्थ्यांशी आमचा सततचा दृढ संबंध आहे. त्यांना गोळा केलं. मग विद्युत लहरीप्रमाणे विद्यार्थ्यांकडून विद्यार्थ्यांकडे आमच्या सुवर्ण महोत्सवाचा संदेश पोहोचू लागला. आणि अक्षरशः शेकडो विद्यार्थ्यांचा राबता, आमच्या शाळेत सुरू झाला. उत्साही आणि कार्यकर्त्या विद्यार्थ्यांचं कार्यकारी मंडळ बनवून सुवर्ण महोत्सवाचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांकडून आणि विद्यार्थ्यांतर्फे देणगीच्या रुपाने आणि स्मरणिका काढून जाहिरातींच्या मार्गाने निधी जमवावा असं ठरलं. पण छोटयाशा शैक्षणिक क्षेत्रात वावरणारे आम्ही, आमचा जाहिरात देणाऱ्या वर्गाशी परिचय नाही. तेव्हा निधीच्या बाबतीत आमचा Low aim होता. पण आमचे एक माजी विद्यार्थी रिलायन्स हीट ट्रान्स्फर प्रा. लि. व इबर्स या कंपन्यांचे डायरेक्टर श्री. दत्ता सावंत यांनी, निधीच्या बाबतीत वईपर्यंतच्या आमच्या उड्डाणाला गरुडझेपेचे स्वरुप दिलं. स्वतःची ४००० रुपयांची जाहिरात तिथल्या तिथे देऊन अधिक जाहिराती मिळवून देण्याचं आश्वासन दिलं. लागलीच हरी केशव गोखले या सुवर्णपेढीचे मालक श्री. मनोहर घारपुरे यांनी त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आपली जाहिरात जाहीर केली, आणि मग अनेक माजी विद्यार्थी पुढे सरसावले. कु. वसंत नारकर याने सुवर्ण महोत्सवाच्या दिवशी शाळेच्या इमारतीची सजावट विनामूल्य करून देण्याचं आश्वासन दिलं. तर कु. अरविंद मेस्त्री याने सुवर्ण महोत्सवांतल्या कार्यक्रमाचे सर्व फोटो विनामूल्य काढून देण्याची जबाबदारी स्वीकारली. पहिल्या एक दोन सभेतच

# शाळेचा इतिहास

खेतवाडी मेन रोड वरील एक भव्य इमारत. या इमारतीत युनियन हायस्कूल भरते. ही शाळा जून १९३२ मध्ये स्थापन झाली. तेव्हापासून गेली ५० वर्षे ही शाळा खेतवाडी विभागात विद्यादानाचे पवित्र कार्य करण्यात रत आहे. कै. यशवत महादेव जुवळे हे विल्सन हायस्कूलमध्ये काम करीत आत. त्यांचा आणि विल्सन हायस्कूलच्या व्यवस्थापकांचा काही मतभेद झाल्यामुळे कै. जुवळ यांनी ती शाळा सोडली. कै. जुवळे हे राष्ट्रीय बाण्याचे हाडाचे शिक्षक. आपल्या मनासारखे राष्ट्रीय शिक्षण देता येईल अशी एक स्वतंत्र शाळा काढावी हा विचार अष्टौप्रहर त्यांच्या मनात घोळत असायचा. आयती संधी चालून आली होती, तेव्हा आपल्या काही शिक्षणप्रेमी मित्रांशी विचारविनिमय करुन, नवीन शाळा काढण्याचा बेत त्यांनी पक्का केला. माननीय वा. रा. पाटणकर यांचे मेव्हणे श्री. विनायकराव आपटे यांनी सुचविल्याप्रमाणे शाळेचे नांव 'युनियन' असे मुक्रर करण्यात आले व 'सा विद्या या विमुक्तये' हे ब्रीदवाक्य म्हणून स्वीकारण्यात आले. कै. लक्ष्मीकांत भांडारे, कै. वासुदेवराव सुखटणकर, कै. स. खं. भिवंडकर, कै. श्री. ग. चितळे, कै. ल. पू. पेंडसे, क. वि. रा. पाटकर, श्री. वा. रा. पाटणकर व श्रीमती लीलाबाई फडके व स्वत: क. य. म. जुवळे यांच्या सहीचे एक जाहीर पत्रक काढण्यात आले व आम्ही ६ जून, १९३२ रोजी युनियन हायस्कूल नामक एक नवीन शाळा पारेख वाडीत काढीत आहोत असे जाहीर करण्यात आले. पत्रकात 'शाळेतील विद्यार्थी आदर्श नागरिक व राष्ट्रभक्त बनतील असे सर्वांगीण व संपूर्ण शिक्षण देण्याचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून मुलांना सर्वार्थाने व सर्वांगाने घडविण्याची जबाबदारी ही शाळा उचलणार आहे', असे आश्वासन देण्यात आले होते.

एक नामवंत शिक्षणतज्ज्ञ म्हणून ख्यातनाम असलेले कै. लक्ष्मीकांत भांडारे हे प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे विल्सन हायस्कूलमधून नुकतेच सेवानिवृत्त झाले होते. त्यांना पाचारण करुन शाळेचे मुख्याध्यापकपद देण्यात आले. कै. भांडारे यांची प्रकृती बेतावाताचीच, पण या मंडळींचा उत्साह पाहून ही जबाबदारी स्वीकारणे त्यांनी मान्य केले. फ्रेंच भाषेचे उत्कृष्ट शिक्षक म्हणून लौकिक असलेले कै. वासुदेवराव सुखटणकर हे मराठा हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करीत होते. त्यांना मानाने बोलावून, त्यांच्यावर उप मुख्याध्यापकाची जबाबदारी टाकण्यात आली. क. जुवळे हे शाळेचे सुपरिंटेंडेंट म्हणून काम पाहू लागले.

त्या काळी प्रथम एक दोन इयत्ता सुरु करुन मग क्रमाक्रमाने वर्ग वाढवून शाळेचे रुपांतर हायस्कूलमध्ये करायचे, नवीन शाळा अशा सुरू होत. आमच्या शाळेचे वैशिष्टच असे की, ही शाळा सुरू झाली तीच मुळी हायस्कूल म्हणून. म्हणजे १ ते ७ इयत्ता एकदम सुरू करण्यात आल्या. सुरुवातीलाच पटावरची मुलांची संख्या ५०० च्या वर गेली. मुले शाळेत आली ती कै. भांडारे यांच्या नावामुळे. पण योगायोग असा की पत्रकात जाहीर केल्याप्रमाणे ६ जून १९३२ रोजी काही ही शाळा सुरु होऊ शकली नाही. कारण त्या दिवशी मुंबईत हिंदू-मुसलमानांचा दंगा उसळला

तेव्हा पुढे ४–६ दिवसांनी वर्ग थोडा शमल्यावर ही शाळा सुरू झाली.

प्रथम ही शाळा विठ्ठलभाई पटेल रोडवरील पारेखवाडी येथे भरत असे. पण ही जागा अपुरी असल्यामुळे खेतवाडी मेन रोडवर असलेला आणखी एक बंगला घेण्यात आला व तेथे काही वर्ग भरू लागले. आज ही वास्तू अस्तित्वात नाही. १ ते ४ इयत्ता पारेखवाडीत व ५ ते ७ इयत्ता या बंगल्यात अशा काहिशा त्रिस्थळी यात्रेत शाळा सुरू झाली. कै. मूळजी वल्लभजी यांची एक तीन मजली इमारत खेतवाडी मेन रोडवर उभी होती. शाळेच्या संस्थापकांपैकी एक कै. श्री. ग. चितळे यांनी खूप खटपट करून कै. शाळजी वल्लभजी यांच्याकडून ही इमारत शाळेसाठी मिळवली. ती इमारत म्हणजेच आजची युनियन हायस्कूलची इमारत.

इमारत मिळाली. पण शाळेचे वर्ग बसवण्याजोगी सुयोग्य नव्हती. या इमारतीच्या तळमजल्यावर कै. टी. गज्जर यांचा औषधांचा कारखाना होता. पहिल्या मजल्यावर काही भाडेकरू रहात. दुसरा मजला म्हणजे एक प्रशस्त दिवाणखानाच होता. त्यात परगावाहून आलेल्या नाटकमंडळचा आपलं बिऱ्हाड थाटीत. तो जमाना निराळा होता. आज जिन्याखालची छोटी खोली का असेना, भाडेकरू तिला जळूसारखा चिकटून राहतो, आणि भरपूर मोबदला घेतल्याशिवाय अगर कोर्टकचेऱ्या केल्याशिवाय जागा सहसा सोडीत नाही. शाळेच्या सुदैवाने तळमजल्यावरचा कारखाना दुसरीकडे हलला. भाडेकरूंनी अन्यत्र आश्रय घेतला आणि मग नाटक कंपन्यांऐवजी शाळेने आपलं बिऱ्हाड या इमारतीत थाटलं ते आजतागायत. इमारतीत वर्गांना योग्य अशी बदलाबदल करण्यात आली आणि या इमारतीत शाळेचे आसन स्थिर झालं.

इथे उतरणाऱ्या नाटक कंपन्या गेल्या, पण त्यांच्याबरोबर वास्तूत उतरलेली नाट्यदेवता मात्र कायमची वास करून राहिली आहे. या वास्तूच्या परिसरात चिमण्या डोक्यांवर आपला वरदहस्त फिरवीत ती सतत वावरत असते. आज आमच्या शाळेचे पाचपन्नास विद्यार्थी नाट्यक्षेत्रात मोठ्या तेजाने तळपत आहेत. चौकशी करता ते सांगतील की, आम्ही युनियन शाळेचे विद्यार्थी. शाळेपुढील, छोट्याशा मैदानात स्नेहसंमेलनासाठी घातलेल्या छोट्याशा व्यासपीठावर आम्ही आमच्या अभिनय कलेचे पहिलेवहिले धडे गिरवले.

महाराष्ट्रीयांपुढे सतत उभा राहणारा यक्षप्रश्न आमच्या शाळेच्या संस्थापकांपुढेही उभा राहिला. पसा ! पैसा कोठून आणि कसा जमा करावा ? पण संस्थापक, सेवाभावी, स्वार्थत्यागी, पैशाच्या अडचणीने नाऊमेद नाही झाले. संस्थापकांपैकी सर्व कै. य. म. जुवळे, वि. रा. पाटकर व वासुदेवराव सुखटपकर यांनी स्वत:जवळचे पैसे शाळेच्या कारणी लावले आणि शाळेचा गाडा चालता केला.

कै. श्रीधरपंत पटवर्धन या निष्णात शास्त्रविषय शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली शाळेची प्रयोगशाळा अद्यावत् बनली. क. भिवंडकर व श्रीमती लीला फडके यांनी उत्कृष्ठ अशा ग्रंथांनी समृद्ध असलेले वाचनालय तयार केलं. पहिल्या वर्षीच शाळेला शिक्षणखात्याची मंजुरी आणि मुंबई विद्यापीठाची मान्यता मिळाली आणि १९३३ साली ९० मुलांची पहिली तुकडी मॅट्रीकच्या परीक्षेला बसली.

१३ जानेवारी, १९३४ रोजी आयडियल एज्युकेशन सोसायटी नामक सोसायटी स्थापन करण्यात आली. कै. श्री. ग. चितळे यांनी परिश्रमपूर्वक सोसायटीची घटना तयार केली व ती लागलीच मंजूर करून घेण्यात आली. शाळेला सरकारी अनुदान १९४० सालापासून मिळू लागलं तोपर्यंत शाळा अनुदानाशिवाय चालविण्यात येत होती. शाळा अनुदानाशिवाय चालवायची म्हणजे एक दिव्य असत. पण सारी मंडळी ध्येयमंत्राने भारलेली होती. तेव्हा मिळेल तेव्हा आणि मिळेल तितका पगार घेऊन

या मंडळींनी नेकीने विद्यादानाचे कार्य केले. अशा ध्येयवादी शिक्षकांनी शाळेची पायाभरणी केल्यामुळे, वादळा-पावसाला तोंड देत उभ्या राहिलेल्या एखाद्या वटवृक्षासारखी आपली शाळा अडीअडचणींना तोंड देत आजतागायत उभी आहे आणि प्रगतीचा मार्ग सुधारित आहे.

शाळेच्या स्थापनेनंतर दोन चार वर्षांनी कै. जुवळे व इतर संस्थापक यांच्यात काही मतभेद निर्माण झाले. व्हावयास नको होत्या, त्या कोर्ट कचेऱ्या झाल्या पण मग सर्व मतभेद सामोपचाराने मिटविण्यात आले. पण त्याची परिणती कै. जुवळे यांचा शाळेशी असलेला संबंध तुटण्यात आणि शाळेला आर्थिक फटका बसण्यात झाली.

१९३२ सालात श्री. वा. रा. पाटणकरांच्या प्ररणेने एअर रायफल क्लब सुरू करण्यात आला होता. त्या क्लबमधील केडेटस्ना शिक्षण देण्याचं कार्य शिरवईकर, वैद्य व भास्करराव गोडबोले हे करीत असत. बॉम्बे सिटी ॲम्ब्युलन्सचे उत्साही चालक व आपल्या सोसायटीचे अनेक वर्ष कार्यवाह असलेले श्री. बटुक मेहता यांचे या क्लबला नेहमी सहाय्य व मार्गदर्शन लाभत असे. पण १९३९ साली युद्ध सुरू झाले | व शस्त्रबंदीचा कायदा कडक झाला कॅडेटचा गणवेश सैनिकांसारखा दिसतो या सबबी. वर त्यावेळच्या ब्रिटिश सरकारने या क्लबवर बंदी घातली व अशा तऱ्हेने एका चांगल्या उपक्रमाची समाप्ती झाली.

एस्.एस्.सी. बोर्ड स्थापन होऊन बोर्डाने घेतलेली पहिली परीक्षा १९४९ साली झाली. एस्.एस्.सी. बोर्डाने विषयांच्या बाबतीत क्रांती केली. शालांत परीक्षसाठी नियुक्ती केलेल्या विषयांमध्ये व्यापार-विषयक विषयांचाही समावेश करण्यात आला त्याचा फायदा घेऊन शाळेने जून १९५२ पासून व्यापारी शिक्षण चालू केले. या वर्षापासून शाळेत अर्थव्यवहार जमाखर्च, टंकलेखन, लघुलेखन (इंग्रजी) हे विषय शिकविण्यात येऊ लागले. या बाबतीत सुरुवातीची घडी घालण्यात सिडनहॅम कॉलेजचे प्रांचार्य कै. डॉ.

मुरंजन, टायपिंग मशीन्स मिळवून देण्यात मे. ग्यालिआ कोटवाला, श्री. जी. एस्. लिमये, श्री. अमुभाई ए. देसाई व श्री. डब्ल्यू. आर्. गवंडे आणि अर्थसहाय्य करण्यात डॉ. एम्. एस्. पंडित यांची अनमोल मदत झाली. १९५६ साली हे विषय घेऊन विद्यार्थ्यांची पहिली तुकडी शालांत परीक्षेस बसली. वाणिज्य महाविद्यालयात झटकन प्रवेश मिळण्यास या विषयांचा फार उपयोग होतो. तेव्हा विद्यार्थी व पालक यांचा या विषयांकडे विशेष ओढा असतो. पुढे पुढे इंग्रजी लघुलेखन मुलांस जड जाऊ लागल्याकारणाने बंद करण्यात आले. १९८० पर्यंत ते विषय शाळेत शिकविले जात होते. पण शिक्षणाचा आकृतीबंध बदलल्यामुळे व गिरगांवातील शाळेतील मुलांच्या संख्येत घट होऊ लागल्याकारणाने शिक्षकांच्या बाबतीत आणि वेळा पत्रकाच्या बाबतीत काही अडचणी निर्माण होऊ लागल्या. त्यामुळे १९८१-८२ या वर्षापासून, शाळेने हे विषय शिकविण्याचे मोठ्या अनिच्छेने बंद केले.

आमच्या शाळेच्या इमारतीत न्यू इरा नाइट हायस्कूल या नावाची एक रात्रशाळा चालत असे. १९५५ सालापासून आपल्या सोसायटीनेही शाळा चालवावयास घेतली. शाळेत प्रथम ८, ९, व १० एवढेच वर्ग होते. १९५६ साली ११ वीचा वर्ग उघडण्यात आला. त्याला सरकारी मान्यता मिळून १९५७ साली शाळेची पहिली तुकडी शालांत परीक्षेस बसली.

सोसायटीने ही रात्रशाळा घेतल्यावर तिच्या मुख्याध्यापकपदी श्री. स. वि. खरवंडीकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर त्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. न. श्री. भावे, कै. अ. वि. पाटणकर व श्री. भा. दा. पटवर्धन यांनी भूषविले. आज या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून श्री. सु. शं. पंडित हे काम पहात आहेत.

१९४२ साली मुंबईतीव शाळांवर एक गंडांतर आलं. युद्धाच्या भीतीने लोक मुंबईच्या बाहेर पळाले व मुंबई ओस पडली. यापुढे शाळा चालतील की नाही, अशी भीती उत्पन्न झाली. त्यावेळी एक खबरदारी

म्हणून शाळेतील जवळजवळ सर्व शिक्षकांना नोटिसा देण्यात आल्या. त्यामुळे काही चांगल्या शिक्षकांस शाळा मुकली. पण ही भीती काल्पनिक व क्षणजीवी ठरली. थोड्याच काळात लोक मुंबईला परतू लागले. युद्धोत्तर काळात तर मुंबईतील वस्ती पावसाळ्यात उगवणाऱ्या छत्र्यांच्या, झपाट्याने किंवा त्यापेक्षाही झपाट्याने वाढली आणि शाळा अपुऱ्या पडू लागल्या. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलांची सोय व्हावी या हेतूने, शिक्षण खात्याने शाळा दुववत चालविण्याची योजना आखली. त्या योजनेचा फायदा घेऊन आम्हीही आमची शाळा १९५९ च्या जून पासून दुववत पद्धतीने चालवू लागलो. या काळात विद्यार्थ्यांची संख्या १८०० च्या घरात गेली व आर्थिकदृष्ट्याही शाळा चांगलीच स्थिरावली. आमच्या या काहिशा सुस्थितीचा फायदा घेऊन, तोपर्यंत भाड्याने असलेली शाळेची इमारत आम्ही ७ एप्रिल, १९६४ रोजी विकत घेतली. आज ही इमारत आमच्या सोसायटीच्या मालकीची झालेली आहे. इमारतीचे मालक यांच्या सहकार्याने हा खरेदी व्यवहार सुकर झाला. या काळी सोसायटीचे मा. चिटणीस श्री. बटुक मेहता, त्यांचे वडील कै. हिरालाल मेहता व सोसायटीचे त्यावेळचे अध्यक्ष कै. बी. एन्. गोखले यांचे खूप सहाय्य झाले.

१९४२ सालचं गंडांतर क्षणजीवी ठरलं, पण सध्या गिरगांव विभागातील शाळा आणखी एका भोवऱ्यात गटांगळ्या खात आहे. आमचीही शाळा त्याला अपवाद नाही. जागेच्या अडचणीमुळे व टंचाईमुळे गिरगांवातील मध्यमवर्गीय लोक मोठ्या संख्येने उपनगरात स्थलांतर करीत आहेत. त्याच्या परिणामी गिरगांवातल्या शाळा उन्हाळ्यातल्या नदी-विहिरींप्रमाणे आटल्या आहेत. एक वेळ १८०० च्या वर असलेली विद्यार्थ्यांची संख्या आज ८००–८५० वर घसरली आहे. What a fall my country men ! असं म्हणायची पाळी आमच्यावर आली आहे.

विद्यार्थ्यांची संख्या घटायला आणखीही एक कारण घडलं आणि ते म्हणजे शिक्षणाचा १०+२+३ असा बदललेला आकृतीबंध. १० च्या इयत्तेशी माध्यमिक शिक्षण थांबल्या कारणाने ११ वी इयत्ता शाळेतून गेली. आमच्या ११ वी च्या ५–५ तुकड्या असत. साहजिकच संख्येत लक्षणीय घट झाली.

१०+२+३ हा आकृतीबंध १९७५ साली ठरविण्यात आला. ११ वी व १२ या वर्गांना उच्च माध्यमिक अशी संज्ञा आहे. १९७५ सालापासून आम्हीही ११ वी वाणिज्य शाखेचा वर्ग शाळेत चालू केला. १ ल्या वर्षी या वर्गाचे माध्यम मराठी होते. पण विद्यार्थ्यांचा कल इंग्रजी माध्यमाकडे असतो हे लक्षात घेऊन, आम्ही दुसऱ्या वर्षीच या वर्गाचे माध्यम इंग्रजी केले. पण या उच्च माध्यमिक वर्गाच्या बाबतीत शाळा सुखी–समाधानी नाहीत. कारण हे वर्ग चालविण्याची परवानगी महाविद्यालयांनाही दिली गेल्या कारणाने, शाळांचे वर्ग भरावे तेवढे भरत नाहीत. पालक व शिक्षकांचा ओढा साहजिकच महाविद्यालयांकडे असतो. आणि त्यामुळे हे वर्ग थोडेसे भरले तरी, हुशार मुले शाळांकडे फिरकत नाहीत. तरीही आमच्या ११ वी च्या वर्गात ६०–६५ विद्यार्थी असतात. पण या वर्गाचं भवितव्य उज्ज्वल आहे असे वाटत नाही.

हल्ली शिक्षकांना पगार उत्तम नसला तरी बऱ्यापैकी मिळतो. सरकारने १९७४ पासून शिक्षकांच्या नोकरीची हमी घेतली आहे, शिक्षकांचा पगार आणि शाळांचा खर्च यांची सर्व जबाबदारी सरकारने उचलली आहे. पण मुलांच्या फीचा भरणा शाळांना सरकारच्या तिजोरीत करावा लागतो. शिवाय दरवर्षी डेव्हलपमेंट फंड म्हणून विशिष्ट रक्कम सरकारात भरावी लागते. त्यामुळे ज्या शाळांची संख्या घटते त्या शाळांना तोटा सोसावा लागतो. आमची शाळा या तोटा सोसाव्या लागणाऱ्या शाळांच्या गटात मोडते.

बऱ्याच प्रमाणात शिक्षकांना नोकरीची शाश्वती लाभली, पगाराची हमी मिळाली. पण अजून शाळांचे संपूर्णपणे सरकारीकरण झालेले नाही. आमचे ढळढळीत वैधव्य नसून मिळमिळीत सौभाग्य आहे.

शिक्षक हा धड सरकारी नोकर नाही आणि धड खाजगी नोकरही नाही. 'ना घरका ना घाटका' असा मामला आहे. शाळांच्या या अर्धवट स्थितीमुळे शाळेचे व्यवस्थापन ही एक खडतर बाब होऊन बसली आहे.

माझी व्यथा

आमच्या शाळेची कथा सांगितली, आता माझी एक व्यथा सांगतो. दारुण व्यथा ! आपला देश स्वतंत्र झाला आणि स्वातंत्र्यात जन्मलेली पिढी आता शिक्षण घेत आहे. पारतंत्र्यात शिक्षण घेतलेले आम्ही, स्वातंत्र्यात शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्यांना शिकवायला फिट ठरतो, याचा सरळ अर्थ असा की, स्वतंत्र होऊन इतकी वर्षे लोटली पण आमची शिक्षण पद्धती एक तसूभरही पुढे सरकली नाही. एस्. एस्. सी. बोर्डाने 'चौसष्ट' कलांचा समावेश आपल्या अभ्यासक्रमात केलेला आहे. पण बहुतेक शाळा अजून जुन्या पद्धतीच्या खोड्यातच अडकलेल्या आहेत जीवनोपयोगी शिक्षण देण्याची हाक म. गांधींनी १९३० च्या अगोदर दिली होती. इतकी वर्षं झाली तरीसुद्धा आमची शिक्षणपद्धती अजून पुस्तकी शिक्षणाच्या भोवऱ्यातच गटांगळ्या खात आहे. ज्यांच्या बुद्धीला शतकानुशतके आणि पिढ्यान् पिढ्या शिक्षणाचे संस्कार जडले होते, अशांची मुले जेव्हा शिक्षण घेत होती, तेव्हा त्यांना वाटेल तेवढे कठीण विषय झेपले. पाण्यात पडल्यावर बदकाने सहज पोहायला लागावं, तशी ही मुलं शाळेत लीलया रमली, शाळेतले कठीण विषयसुद्धा त्यांनी सहज आत्मसात केले. पण आज परिस्थिती बदलली आहे. जे लोक वेदकालापासून शिक्षणाला आंचवले होते, अशांची मुलं आता शिक्षण घेऊ लागली आहेत. तेव्हा शिक्षणाचा संपूर्ण कायापालट व्हायला हवा होता. शिकवताना विद्यार्थ्याला गणित सुटलं नाही, इंग्रजी जमलं नाही आणि आम्ही त्याच्या कपाळावर अन्फिट म्हणून शेरा मारतो. दुर्दैव आमचं (की त्याचं ?) की ते अन्फिट नाहियेत, ते मिसफिट् आहेत हे आम्हाला समजत नाही. ज्यांना आम्ही अन्फिट मानतो, ते कुठेतरी 'फिटर' किंवा 'फिटेस्ट' आहेत. परिस्थिती अशी आहे की आम्हाला जे येतंय् ते त्यांना नकोय् आणि त्यांना जे हवंय् ते आम्हाला येत नाही. म्हणून अनेक जटिल समस्या निर्माण होतात आणि विद्यार्थ्यांबद्दल गैरसमज पसरतात. दुर्दैवाने आजही ज्या लोकांचा शाळेत शिक्षक म्हणून भरणा होतो ते कसे आहेत ? पुस्तकी विद्येची पुसट पुटं चढलेले कोलंबस–वास्को-डि-गामा, न्यूटन यांच्या जगात पांगळ्यासारखे वावरणारे. कारणं काहीही असोत पण त्यांची कुवत बेताचीच. मी अजून चांगली दुर्बिण बघितली नाही. विमान काठीच्या अंतरावरून पाहिलं नाही, आणि कॉम्प्यूटर ही काय भानगड आहे, तेही मला माहीत नाही. बंदुकीची गोळी लिमलेटच्या गोळीच्या आकाराची असते, असाच बऱ्याच जणांचा ग्रह. ही माणसं बलदंड पिढी काय तयार करणार ? पण निकोप मनाची बलदंड पिढी कुणाला तयार व्हायला हवी आहे का ? संस्कारांच्या बाबतीत सर्वत्र उन्हाळा. प्रातःस्मरण सुरू होतंय् डिस्को संगीतानं, ओठावर स्तोत्रं आहेत प्यार–मोहोब्बत–दिल्लगीची. जो तो आपलं तन आणि मन इंपोर्टेड घाणीने बरबटून घ्यायला उत्सुक झालेला. राष्ट्रीय एकात्मतेच्या नावाखाली विषवृक्ष लावले जाताहेत आणि पोसले जाताहेत, धुरिणांच्या धमन्यांतून रक्त वाहतंय भ्रष्टाचाराचं. आणि जो तो चुरडला जातोय् राजकीय रणगाड्याखाली. पण आमचं गाऱ्हाणं सांगायचं कुणाला ? करुणा भाकायची कुणाची ? आपल्या निरीला हात घालणाऱ्या अडदांड निमुर्दाड कौरवांविरुद्ध संरक्षण मागायचं धृतराष्ट्राजवळ. पण तो आंधळा असहाय्यपणे झालाय् सिंहासनाधिष्ठित आणि झाकतोय् आपलं दयनीय विकलांग राजवस्त्रांत. हे बदललं पाहिजे. ब्रह्म जाणणारे ब्राह्मण जन्मले पाहिजेत. विश्वाला कवटाळणारे विश्वकर्मा निर्माण झाले पाहिजेत. ते केव्हा निपजतील तेव्हा निपजोत. सध्या तरी नमस्ते !

**मु. अ. जोशी,**
**मुख्याध्यापक,**





श्री. वा. रा. पाटणकरांचा डॉ. भिंगारकर यांच्या हस्ते सत्कार.



श्री. वा. रा. पाटणकर यांच्या हस्ते मावळते मुख्याध्यापक श्री. मु. अ. जोशी यांचा सन्मान.



श्री सत्यनारायणायेति समर्पयावः।
श्री. वा. रा. पाटणकर व सौ. पाटणकर.



कु. सुमति दादरकर – माजी चित्रकला शिक्षिका यांचा श्री. वा. रा. पाटणकर यांच्या हस्ते सन्मान.

शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी १९८१-८२






कै. ल. शि. भांडारे, १९३२–४३




कै. वा. सुखथनकर शाळेचे पहिले
सुपरिंटेंडट, १९३२–३३



कै. सू. खं. भिवंडकर, १९४३–४४

## शाळेचे मुख्याध्यापक



श्री. वा. रा. पाटणकर,
१९४५ ते १९५७



कै. भा. का. लाड
सप्टें. १९५७ ते जाने. १९६२




श्री. स. वि. खरवंडीकर
जाने. १९६२ ते मे १९६५



श्री. के. ना. कोल्हटकर
जून १९६५ ते जून १९६८




श्री. न. श्री. भावे
जून १९६८ ते जाने. १९७४



श्री. मु. अ. जोशी
जाने. १९७४ ते जुलै १९८२



मानवी मनोरा – भांगडा नृत्य.
सुवर्ण महोत्सवी स्नेहसंमेलन




क्रीडा महोत्सव बक्षिस समारंभ

'युनियन हायस्कूलचा मला अभिमान वाटतो.
सुवर्ण महोत्सवास माझे आशीर्वाद–'
–प्रेमकुमार शर्मा



नमस्ते ! सुवर्ण क्रीडा महोत्सव



सुवर्ण महोत्सवी स्नेहसंमेलनातील एका नाटचप्रवेशातील दृश्य.

# शिक्षणेतर क्षेत्रातले मानसन्मान

शिक्षणाव्यतिरिक्त क्रीडा, नाट्य व वक्तृत्व या क्षेत्रातही अनेक पराक्रम आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी गाजवलेले आहेत.

क्रीडा – हुतूतू (कबड्डी) मध्ये घाटेशील्ड अनेक वेळा आमच्या शाळेने जिंकलेले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य कबड्डी सामन्यात अनेक वर्षे 'अ' गटातील अंतिम सामना आमच्या शाळेच्या संघाने जिंकलेला आहे.

आमच्या शाळेच्या व्हॉलीबॉल संघाला जिल्हा पातळीवर खेळण्याचा मान मिळालेला आहे. विशेष अभिमानाची गोष्ट म्हणजे कु. प्रकाश नार्वेकर व कु. गोविंद बस्ताव यांना राज्य पातळीवर व्हॉलीबॉल खेळण्याचा मान मिळाला होता.

शाळेचा एक विद्यार्थी कु. सुधाकर प्रभुणे यास भारतीय टेबल टेनिस स्पर्धेत रौप्य पदक मिळाले.

कुमार कला केंद्र, दादर, या संस्थेतर्फे घेण्यात येणाऱ्या नाट्य स्पर्धेमध्ये लागोपाठ दोनदा आपल्या शाळेने सादर केलेल्या नाट्यप्रवेशास बक्षिसे मिळाली. एक वर्ष नाट्य लेखनास बक्षिस व पदक मिळाले.

शाळेचे खास वैशिष्टय म्हणजे वक्तृत्व. गिरगावांतील राम मोहन इंग्लिश स्कूल या शाळेतर्फे शिरुर ट्रॉफीसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येत असे. आमच्या शाळेने ही ढाल १०–१२ वर्षे जिंकली. शिवाय बॉम्बे सिटी यूथ असोसिएशन या संस्थेतर्फे ही काही वर्षे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येत असे. प्रत्येक वर्षी ही स्पर्धा आपल्याच शाळेतील विद्यार्थ्यांनी जिंकली. या स्पर्धेतील विजेते वक्ते येणेप्रमाणे :–

१) कु. सुरेश खरे – कु. जगन्नाथ मंजुनाथ प (१९५२)
२) कु. रमेश नरवणे – कु. शशिकांत रसाळ (१९५४)
३) कु. शशिकांत कारेकर – कु. मोरेश्वर पटवर्धन (१९५६)
४) कु. रविंद्र दिवेकर – कु. भगवान चव्हाण (१९५७) ट्रॉफी नाही.
५) कु. नारकर – कु. बिजूटकर (१९५८)
१ ले बक्षिस
६) कु. मुकुंद जयकर (१९६०)
२ रे बक्षिस
७) कु. गंगाधर अभ्यंकर – कु. सुधाकर फणसेकर (१९६१)
१ ले बक्षिस
८) कु. सुभाष राजे – कु. निळकंठ दामले (१९६२)
१ ले बक्षिस
९) कु. माधव सावंत – कु. चंद्रकांत जोशी (१९६४)
१ ले बक्षिस २ रे बक्षिस
१०) कु. माधव पाटणकर – कु. नारायण गाणिगा (कामत) (१९६४)
१ ले बक्षिस २ रे बक्षिस
११) कु. चंद्रकांत पानसे – कु. मेघश्याम भावे (१९६६)
१ ले बक्षिस २ रे बक्षिस
१२) कु. शरद सुर्वे – कु. शशिकांत पवार (१९६८)
२ रे बक्षिस

शिवाय बॉम्बे सिटी यूथ असोसिएशन यांच्यातर्फे ठेवण्यात आलेली वक्तृत्व स्पर्धा जिंकून खालील विद्यार्थ्यांनी ढाल मिळवली.

१) माधव पाटणकर – नारायण गाणिगा (कामत) (१९६४)
१ ले बक्षिस २ रे बक्षिस
२) चंद्रशेखर कारेकर – कु. सुहास मलुष्टे (१९६९)

जनता केंद्र वक्तृत्व स्पर्धा – शरद सुर्वे – शशिकांत

पवार (१९६८) यांनी जिंकली. सुर्वे यास १ ले बक्षिस.

शिवाय खालील विद्यार्थ्यांनी शाळेला मानसन्मान मिळवून दिला.

१) कु. मोहन भावे (१९६१) – भारत सरकारच्या नॅशनल स्कॉलरशिप स्कीम तर्फे मेरिट स्कॉलरशिप मिळाली.

२) कु. नारायण गाणिगा कामत – रिन्सो कंपनीच्या ओपन प्राइझ कॉम्पिटिशनमध्ये २ रे बक्षिस.

३) कु. पार्टे – चित्रकला परीक्षा – इंटर मिजिएट व कु. शशिकांत भा. पांचाळ – एलिमेंटरी – बक्षिस मिळाले. (१९७७)

४) कु. अनिल ला. मांदळकर – इलि. ड्रॉईंग ग्रेड परीक्षा – अ श्रेणी बक्षिस – (१९७९).

१) कु. पुरुषोत्तम पंडित. साने गुरुजी कथा माला – सुवर्ण महोत्सवी अधिवेशन–कथा कथनामध्ये १ ले बक्षिस (नोव्हें. १९७७).

२) १९७२ साली दिनांक १३, १४ व १५ रोजी भारताच्या स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. त्या निमित्त निरनिराळ्या स्पर्धा घेण्यांत आल्या होत्या. गिरगांव विभागाच्या स्पर्धात कु. चंद्रशेखर य. सुर्वे यास चित्रकलेत बक्षिस:

३) जानेवारी १९७२ – चंदारामजी गर्ल्स हायस्कूलमध्ये रांगोळी स्पर्धा. कु. भरत नगरकर यांस बक्षिस.

शाळेतील एक (संस्कृत) शिक्षक श्री. गजानन शास्त्री गायतोंडे यांनी शाळेच्या लौकिकात मोठीच भर घातली. १९६१ मध्ये मध्यवर्ती सरकारतर्फे घेण्यात आलेल्यासंस्कृत पाठ्यपुस्तक स्पर्धेमध्ये यांना २००० रुपयांचे बक्षिस मिळाले. संस्कृत विषयासाठी म्हणून यांची ही पाठ्यपुस्तके भारतभर लावण्यात आली होती.

४) १९४५ साली श्री. भडकमकर जी. व्ही. मॅट्रीकमध्ये संस्कृतचे बिडकर पारितोषिक मिळविले.

५) १९५६ साली श्री. डी. एल्. बांदेकर एस. एस. सी. परीक्षेत संस्कृतचे बिडकर पारितोषिक मिळविले.

६) १९३६ साली एच्. एम्. परब मॅट्रीकच्या पुरवणी परीक्षेत विद्यापिठात १ ला क्रमांक मिळाला.

७) १९३६ साली श्री. जी. एल्. दाते याने मॅट्रीकच्या परीक्षेत बाई माणेकजी बेहरामजी जिजिभाई पारितोषिक 'शास्त्र' या विषयात मिळविले.

८) १९३२ – चित्रकला परीक्षा – इंटरमिजिएट ग्रेड मध्ये नेचर या ड्रॉईंगमध्ये १ ले पारितोषिक मिळविले.

९) १९४६ च्या मॅट्रीक परीक्षेत के. जी. डोळस याने गणित या विषयात २०० पैकी २०० गुण मिळवून १०० रु. चे पारितोषिक मिळविले. तसेच यास गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटी – अहमदाबाद – नसरवानजी वनसा पारितोषिक मिळाले.

१०) १९५१, १९५२, १९५३, १९५४ या वर्षी शाळेतील विद्यार्थ्यांनी सतत चार वर्षे एस्. एस्. सी. बोर्डाचे पाली विषयाचे पारितोषिक मिळविले. पारितोषिक मानकऱ्यांची नांवे येणेप्रमाणे :–

१. विनोद कांबळी – १९५१
२. वसंत तेंडुलकर – १९५२
३. चंद्रकांत मांजरेकर – १९५३
४. सुधीर देवकर – १९५४.

# माझी शाळा माझे संस्कार

लेखक : स. गं. मालशे

माझ्या लहानपणी माझी आजी खूप ओव्या म्हणायची. त्यात ''शाळेतल्या पंतोजींना'' अशा प्रारंभाच्या बऱ्याच ओव्या असत. उदा. – ''शाळेतल्या पंतोजींना देऊ केला धोतरजोडा । नको मानेवरी खडा । ××× बाळाच्या'' किंवा ''शाळेतल्या पंतोजींना देऊ केली ताटवाटी । नको मारू छडी, काठी । ××× बाळा.'' त्यांचा सारांश हा होता की, तुम्हाला अमुक देतो, तमुक देतो, पण माझ्या बाळाला छळू नका. कारण तेव्हा शाळा म्हणजे छडी लागे छम् छम्. शाळा म्हणजे पोरांचा कोंडवाडा. शाळा म्हणजे छळ, शाळा म्हणजे कंटाळा, अशींच समीकरणे बालकांच्या वा पालकांच्या नव्हे तर खुद्द शिक्षकांच्याही मनात ठाण मांडून असत. शिक्षण शास्त्रज्ञांच्या मते वयाची १५ ते १७ ही वर्षे मनोबुद्धीच्या विकासाचीं असतात. पुढे विस्तारात्मक किंवा प्रमाणात्मक वाढ होते, पण गुणात्मक फरक फारसा पडत नाही. माझ्या वयाचीं नेमकीं हीच वर्षे युनियन हायस्कूलमध्ये गेलीं. माझ्या मनात वर सांगितलेलीं समीकरणे कधीच मांडली गेली नाहीत. उलट विद्यार्थी म्हणून मी शाळेत मनापासून रंगलो.

तसा मी एक गावठी विद्यार्थी होतो. भाऊच्या धक्क्यावरून उतरून कांदेवाडीत काकांच्या बिऱ्हाडी शिक्षणासाठी आलेला. चुकल्या हरणासारखी माझी चकभूल स्थिती व्हायची. पण केतकर कुटुंबाचा मला आश्रय मिळाला. आमच्या बिऱ्हाडापासून विरूंन शाळा जवळ होती. ती मिशनऱ्यांची आणि काहीशी उच्चभ्रू. त्या शाळेतल्याच काही राष्ट्रीय वृत्तीच्या शिक्षकांनी आजीव सदस्यत्व पद्धतीवर युनियन ही नवी शाळा काढलेली होती. श्री. गोडबोले व श्री. बटुक मेहेता तेथे रायफल क्लबही चालवीत. असे काहीसे वलय शाळेभोवती होते. असे आकर्षण असले तरी माझी अडचण वेगळीच होती. त्या वर्षी मी पहिल्या सहामाहीत आजारी होतो. दुसऱ्या सहामाहीत मध्येच परीक्षा देऊन मला प्रवेश हवा होता. शिवाय घरची गरीबी असल्याने पुढेमागे नादारी मिळेल अशी शक्यताही पहायला हवी होती. हे सारे योग युनियनबाबत जुळून आले. चार टवाळ, पण थोडेफार चुणचुणीत विद्यार्थीअसतात, त्यातला मी होतो. अभ्यासात बऱ्यापैकी हुशार. कुसंगतीने माझ्याकडून शाळेत आगळीक घडली नाही असे नाही. पण शाळेने मला आईच्या मायेने वागवले. माझे अपराध पोटात घातले.

शाळेतल्या काही शिक्षकांची विशेषतः कै. ग. कृ. कर्वे आणि श्री. धनंजय वद (आता वकील) यांनी माझे जणू काही पालकत्वच केले. त्यांचा आधार नसता तर माझे पाय या अफाट मुंबईत ठरूच शकले नसते. श्री. कर्व्यांच्या उत्तेजनामुळे माझे कॉलेजचे शिक्षण पूर्ण होऊ शकले. मी शाळेत शिकत होतो तेव्हाही कै. भा. का. लाड यांनी मला स्वतःच्या घरची शिकवणी दिली होती.

कदाचित वास्तूचा गुण (शाळेच्या वास्तूंत पूर्वी नाटक मंडळयांची बिऱ्हाडे असत) म्हणून म्हणा किंवा इतिहासाची पुनरावृत्ती व्हायचीच म्हणून म्हणा युनियन हायस्कूलमधून फुटून ओरिएंट हायस्कूल निघाले. शाळेत अराजक माजविण्याचे प्रयत्नही झाले. पण प्रि. भांडारे, श्री. पाटणकर, कै. पाटकर, कै. लाडही

जुनी आषाढी पाय रोवून होती. श्री. पाटणकर करडे कटाक्ष टाकीत तिन्ही मजल्यांवरुन झपाझप येरझारा घालू लागले की आम्ही त्यांना हिटलरच म्हणत असू. (केसांच्या विशिष्ट ठेवणीमुळे ते तसे दिसतही).

त्या काळी 'तू जा, मी येतो' अशी गिरणीप्रमाणे शाळेत अधिवेशने नव्हती. शाळा सुटल्यावरसुद्धा बराच काळ आम्ही शाळेच्या आवारातच रेंगाळत असू. कधी नकाशे काढायला, कधी पाठ्येतर उपक्रमासाठी, कधी ग्रंथालयात. ग्रंथालयात चांगली पुस्तके होती. श्री. कर्वे त्यांची व्यवस्था पहात. तिथे आरामखुर्चीत बसून प्रि. भांडारे काहीतरी इंग्रजी लिहीत असायचे. शब्दांच्या बाबतीत ते भलतेच चोखंदळ. इन्व्हिटेशन, इन्फर्मेशन की इंटिमेशन असा काहीतरी पेच पडून ते डोके खाजवत असायचे. तेवढ्यात कोणी विद्यार्थी आला तर एकदम विचारायचे, "व्हाय डू यू लुक स्टुपिड ?' प्रश्नाच्या अकस्मिकपणामुळे त्या बिचाऱ्याचा स्टुपिड नसलेला चेहरा उगाचच स्टुपिड व्हायचा. मी याच ग्रंथालयात हरिभाऊ, फडके, खांडेकर, वा. म. जोशी हे ग्रंथकार आणि स्मृतीचित्रे, रणांगण सारखी पुस्तके वाचली. ब्लॅक स्टोरी रीडर्स आणि ब्राइट स्टोरी रीडर्स म्हणून ज्या माला होत्या त्या वाचल्या. त्यामुळे इंग्रजीतील अभिजात साहित्याचे कथाभाग मला माहीत झाले.

आमचा अध्यापकवर्ग आपापल्या विषयात तयार होताच, पण साहित्यप्रेमी होता. श्री. पाटणकर इतिहास असा शिकवीत की त्यांनी शिकविलेला भाग पुन्हा वाचावा लागत नसे. श्री. कर्वे मराठी शिकवीत फार परिणामकारक. त्यांचे ते भोकरासारखे टपोरे डोळे, घोगरा आवाज, खादीचा पेहेराव अजून डोळ्यांपुढे येतो. शिप्याची शिकवण, अंगणातला पोपट, गरिबाची अधेली या कथा त्यांनी आम्हाला शिकविल्या. त्यांचे शब्द अजूनही माझ्या कानात निनादतात. कै. भा. का. लाड इंग्रजी शिकवायचे. त्यांच्या वर्गातील वातावरण खेळीमेळीचे असायचे. त्यांची एक कोटी महिला विद्यापीठात मला नेहमी आठवते, ए सोल्जर फेसेस् पॉउडर, ए वूमन पाउडर्स दि फेस्' श्री. कोल्हटकर श्री. साठे गणिताला होते. ते जीव लावून शिकवीत. 'डू यू अंडरस्टँड ?' 'डू यू फॉलो दॅट् ?' असे विचारीत. कोल्हटकर हे अगदी कठीणातले कठीण रायडर आमच्या गळी उतरवीत. कोल्हटकर म्हणजे मूर्तीमंत कळकळ. श्री. वैद्य मास्तर इतिहास शिकवीत. त्यांचा वुडहाऊस लाडका. त्यांचेही वर्गातले एक वाक्य अद्याप आठवते. 'पेसिमिस्ट इज् ए पर्सन हू कॉल्स हाफ् कप्, हाफ एम्प्टी'. ते पुढेही वर्धी भेटत. मी राजकारणात ढालगजपणा करतो ते त्यांना आवडत नसे. ते माझ्या हिताच्या दृष्टीनेच सांगायचे, 'आपल्याला राजकारणात भवितव्य नाही. हात पोळून घेशील."

शाळेचा गणेशोत्सव थाटात व्हायचा. हिराबाई बडोदेकर, कुमार गंधर्व (बाल गंधर्वांची सहीसही नक्कल करणारा तेव्हाचा छोटा गायक) यांची गाणी या उत्सवात मी ऐकली. आमच्या वर्गबंधूने 'उपवनि गात कोकिळा' हे पद झाल्यावर त्याच रागातल्या 'सखया, बोल मोहना !' या पदाची मूर्खपणे फर्माईश केली होती. न. चिं. केळकर, मामा वरेरकर, य. गो. जोशी, वि. ह. कुळकर्णी यांसारखे वक्ते शाळेत आले होते. केळकरांनी सांगितले, "तुमचे वय हे आहे केवळ विद्या शिकून असण्याचे. तेव्हा खूप अभ्यास करा सर्वांचा पहिला नंबर आला तरी चालेल. शाळाचालक हजेरीपत्रक नवी छापून घेतील." य. गो. म्हणाले होते, "तुम्ही लेखक व्हायच्या फंदात पडू नका. असे काही तरी करा की तुमच्यावर कथा किंवा लेख लिहिले जातील." वि. ह. कुलकर्ण्यांचा विषय काय होता आठवत नाही. पण भाषण मिस्किल होते. त्यात 'सभाकंप' 'बसाकंप' अशा कोट्या होत्या. मोर–लांडोर, कोंबडा–कोंबडी इ. उदाहरणे देऊन उत्क्रांति तत्वानुसार स्त्रीपेक्षा पुरुषच सुंदर असला पाहिजे, असे त्यांनी मांडले होते.

शाळेची परीक्षा आणि तिचा निकाल यांच्या दरम्यान आमच्या वर्गाचा एक खास कार्यक्रम असे. आईस्क्रीम तयार करुन ते भरपूर चापायचे. त्या-

साठी लाड मास्तरांची एक स्वतंत्र व्यवस्था होती. इंग्रजीच्या तासाला कोणी मराठीत बोलले की एक पैसा दंड. वर्षाच्या अखेरीस हा निधी जास्त जमावा म्हणून ते बऱ्याच क्लृप्त्या योजायचे. हळूच मागल्या गॅलरीतून वर्गात यायचे. विद्यार्थ्यांच्या कानात हळूच विचारायचे. 'कायरे मसाल्या. ( लाड मास्तरांनी ठेवलेले हे अस्मादिकाचे लाडके टोपन नांव ) तुझ्या शेजारी सलून आहे का ? मी पटकन म्हणून जायचो 'नाही.' मग ते मोठ्याने उद्गारायचे, 'मग ते तू काढ ! एक पैसा दंड.हा आईस्क्रीमचा कार्यक्रम झाला की दुसऱ्या दिवशी हटकून घसे बसायचे.

शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात दोन दोन नाटके व्हायची. कर्वे आणि लाड हे नाट्यवेडेच होते. छोट्यांचे पौराणिक नाटक (ज्याला आम्ही वाडिया मुव्हीटोन म्हणून चिडवायचो) कर्वे बसवीत. मोठ्यांचे म्हणजे आमचे सामाजिक नाटक लाड मास्तर बसवीत. मग लाड मास्तरांचे मित्र रेडीओस्टार या नाटक कंपनीचे नंद खोटे आणि त्यांचा संचत्यांचे 'रेडिओस्टार' या नाटकमंडळीचे नंदू खोटे आणि त्यांचा संच आमच्या दिमतीला असायचा. 'रेडिओस्टारने' काणेकरांचे 'निशिकांताची नवरी' नाटक प्रथम रंगभूमीवर आणले. तेव्हा लागोलाग आमच्याही स्नेहसंमेलनात ते झाले. दिग्दर्शक नंदू खोटे, संगीत दिग्दर्शक गो. रा. मुळे (हेही आमचेच शिक्षक), गुलाब घुमटकर साथीला आणि केशभूषा वेषभूषा दिग्दर्शक खोट्यांच्या पत्नी. (त्या सुद्धा खोट्यांसारख्या उंचनिंच होत्या). लाड मास्तरांनी रचलेले 'विदुषी' नांवाचे नाटक आम्ही बसविले होते. प्रहसनात्मक होते. त्यातले पहिले वाक्य अजून मला पाठ आहे : 'खरंच उषे, एवढं शिक्षण घेतलेल्या मुलीला हे लग्नाचे खुळे विचार सुचतात तरी कसे ?'' मोलियरच्या एका प्रहसनावरुन त्यांनी ते रचले असावे. 'जुन्या जखमा' म्हणून त्यांचा कथासंग्रह आहे. 'तिने असे का केले' ? या नांवाची त्यांची कथा अश्लील म्हणून वादग्रस्त ठरली होती.

शाळेतल्या नाटकात तसेच पाठ्येतर उपक्रमात मी हटकून भाग घेत असे. वक्तृत्वस्पर्धा, निबंधस्पर्धा, वर्गाचे हस्तलिखित, शाळेचे षण्मासिक यांच्यासाठी मला माहिती मिळवावी लागे. मग शिक्षक मार्गदर्शन करीत व मी मुंबई ग्रंथसंग्रहालयात जाऊन संदर्भ-ग्रंथही पहात असे. 'शिक्षणाचे माध्यम', 'अस्पृश्यता निवारण', 'महाराष्ट्र व्यापारात मागे का ?' अशा थोर थोर विषयांवर मी माझ्या जिभेचा पट्टा वॉशिंग्टनच्या कुऱ्हाडीसारखा चालवीत असे. पण या विषयांची तयारी करण्यासाठी मला जे करावे लागले त्यानेच माझ्या मनात संशोधनाचे बीज पेरले गेले. प्रारंभी जी समीकरणे सांगितली तशी समीकरणे माझ्या मनात कधीच आली नाहीत. माझ्या मनात शाळेबद्दल एकच समीकरण आहे, ''युनियन हायस्कूल — माझे व्यक्तित्व घडविणारे सर्वंकष संस्कारकेंद्र.''

०   ०   ०

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

**Bharat Cosmetics**

26, Nikadwari Lane, BOMBAY-400 004.

&

**Trade Links**

Hotel Rahi Building, PANVEL 410206

**Stockist for : Abbolt, BKLto, F.D.C. Guife, Sandoz IPCA J. S. Pharmaceticals.**

# आम्ही कृतार्थ झालो ! आम्ही धन्य झालो !!

आयडीयल एज्युकेशन सोसायटी आणि आपली शाळा यांना ५० वर्षं पूर्ण झाली. त्या निमित्ताने दि. १२ व १३ जानेवारी रोजी, सोसायटी आणि शाळा यांचा सुवर्ण महोत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. त्या दिवशी ५० वर्षांहून पुराणी असलेली ही वास्तू नवीन रंग-वस्त्र लेवून, एखाद्या नवयुवतीप्रमाणे तोऱ्यात उभी होती. ताऱ्यांप्रमाणे लुकलुकणाऱ्या आणि स्फुल्लिगाप्रमाणे चकमणाऱ्या पिटुकल्या विजेरी माळा तिच्या अंगाखांद्यावर रुळत होत्या. ५० वर्षाच्या दीर्घ सेवेमुळे अंगावर उभे राहिलेले कृतार्थतेचे रोमांचच जणू. पाहून वाटत होते, 'उतरली तारका दळे जणू वास्तूत –' सुवर्ण महोत्सवी वर्ष' असं सुरेख अक्षरात लिहिलेला किरमिजी रंगाचा सॅटिनचा फलक, एखाद्या बिरुदासारखा इमारतीवर लटकत होता. पुढचं छोटंसं मैदान रंगीबेरंगी फुग्या-पताकांनी सजलं होतं. शाळेच्या उत्साही आणि कल्पक विद्यमान विद्यार्थ्यांनी आपल्या उत्साही शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपापले वर्ग, दृष्ट लागावी असे सजवले होते. सजावटीला बक्षिसे ठेवली असल्यामुळे, प्रत्येक तुकडीनं आपली कल्पकता आणि कौशल्य पणाला लावले होते. परीक्षक जेव्हा क्रमांक लावण्यासाठी वर्गात फिरू लागले तेव्हा दिपून गेलेली त्यांची बुद्धी निश्चित निर्णय घ्यायला असमर्थ ठरत होती. पौर्णिमेच्या चांदण्यात सागर उधाणून उसळत रहावा तसा विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवर्ग आनंदाने उधाणून गेला होता. वास्तूतील प्रत्येक वस्तु जणू गर्जत होती, ''आज आमचा सुवर्ण महोत्सव ! आज आमचा सुवर्ण महोत्सव !!''

एका छोट्या वर्गात ५, ६ व ७ वीच्या विद्यार्थ्यांचे हस्तकला प्रदर्शन भरले होते. सर्व वस्तू अत्यंत सुंदर आणि प्रेक्षणीय होत्या. पण त्यातल्या त्यात सुपारी काजू, खजूर यांच्या सहाय्याने बनविलेले सनई चौघडा वाले, बांगड्यांच्या तुटक्या तुकड्यांनी तयार केलेले 'सत्यमेव जयते' आणि त्याच्या खाली पोहणाऱ्या हंसाचा जोडा या वस्तूंना तोड नव्हती. तळमजल्यावरील हॉलवजा खोलीत शाळेचे माजी विद्यार्थी सर्वश्री चंद्रशेखर सुर्वे, भारत नगरकर, राजेंद्र जावकर अश्विन नगरकर, अरुण उदमले यांनी तैलचित्रांनाही मागे टाकतील अशी रांगोळी चित्रे रेखाटली होती. कुठलं उत्कृष्ठ कुठलं निकृष्ठ ठरवणं जड जात होतं. ठरवायचंच झालं तर 'हसरं बाळ', 'कपिल देव' 'बोथम' शाळेचे भूतपूर्व मुख्याध्यापक मा. वा. रा. पाटणकर या रांगोळी चित्रांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांचं सौंदर्य शब्दातीत होतं. सजावटीमध्ये 'मिनर्व्हा' चित्रपटगृहाची प्रतिकृति, दोऱ्यांच्या सहाय्याने काढलेला ताजमहाल, सान्यांचे स्वागत करणारा टी. व्ही. किती सांगावं ? इतकं म्हणता येईल की, या छोट्या कलावंतांनी एक मोहमयी नगरीच उभी केली होती. आणि ती ज्यांनी पाहिली त्यांच्या डोळ्यांचं पारणं फिटलं.

दिनांक १२ जानेवारी रोजी शाळेतील सर्व आजी विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. आपापल्या सजविलेल्या वर्गात बसून पुढे आलेल्या पदार्थांची चव चाखण्यात विद्यार्थ्यांना अनोखा आनंद होत होता. अल्पोपहाराचा कार्यक्रम अत्यंत शिस्तीत आणि आनंदात पार पडला. कुठे ना गोंधळ, ना धांदल. याचं सारं श्रेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी दिलेल्या सहकार्याला आणि घेतलेल्या श्रमांनाच द्यावे लागेल. त्यांचा प्रतिसाद गहिवरून टाकणारा होता.

दिनांक १३ जानेवारी रोजी सकाळीच सनई-चौघड्याच्या गजरात सत्यनारायणाची पूजा सुरू झाली. पूजक होते श्री. वा. रा. पाटणकर व त्यांच्या सौभाग्यवती. पूजेनंतर मा. वा. रा. पाटणकर यांच्या हाते शाळेतून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांचा काही द्रव्य, शाल, नारळ व सुवर्ण महोत्सवाचे स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक श्री. मु. अ. जोशी थोडक्या, पण समर्थक शब्दात सत्कारितांचं व्यक्तिचित्र उभं करीत होते. आणि मग ती ती माननीय, मंडळी पुढे येऊन, उपस्थितांच्या टाळ्यांच्या गजरात सन्मान स्वीकारीत होती. सत्कारितात दोन चतुर्थश्रेणीचे कर्मचारी होते. ते सन्मान स्वीकारीत असताना उपस्थितांनी त्यांना टाळ्यांचा अहेर करून आपला आनंद व्यक्त केला. विद्यमान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसही या प्रसंगी सुवर्ण महोत्सव स्मृतीचिन्ह देण्यात आले. अशा तऱ्हेने, गहिवरून टाकणारा हा समारंभ सुमारे अर्धा, पाऊण तास चालला. याच्यानंतर भोजनाचा कार्यक्रम होऊन तृप्त मनाने एकमेकांनी एकमेकांचा निरोप घेतला.

सन्मान समारंभाचे अध्यक्ष होते आमच्या सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ. डी. बी. भिंगारकर. डॉ. भिंगारकर हे सर्वार्थाने सुयोग्य असे अध्यक्ष होते. कारण भिंगारकर हे तहहयात विद्यार्थी. काही वर्षे त्यांनी आपल्या शाळेत शिक्षकाचं कामही केलं होतं. मग एज्युकेशन इन्सपेक्टर म्हणून काम करून ते सेवानिवृत्त झाले. साठी ओलांडलेल्या या गृहस्थांनी नुकताच 'सोशल एज्युकेशन' वर एक प्रबंध लिहून पी. एच्. डी. मिळविली. सारी हयात शिक्षण क्षेत्रात घालविलेले डॉ. भिंगारकर हे अजूनही इन्स्टिटयूट मध्ये व्यवस्थापनाचे काम पाहतात.

संध्याकाळी सर्व माजी विद्यार्थ्यांस तीर्थप्रसादाचे जाहीर निमंत्रण देण्यात आले होते. अक्षरशः हजारो माजी विद्यार्थी, आजी विद्यार्थी, पालक यांनी झगमगत्या वातावरणात तीर्थप्रसाद घेतला. त्या दिवशी हजारो माजी विद्यार्थ्यांनी आम्हाला प्रेमगंगेत न्हाऊ घातलं. त्यांनी दाखविलेलं प्रेम, जिव्हाळा, आपुलकी हे पाहून, आज इतकी वर्षे तुटपुंज्या पगारात आम्ही जे नेकीने विद्यादान आणि सुसंस्कारदान केलं, त्याचं सार्थक झालं असं वाटलं. प्रत्येकाचं मन कदाचित असच म्हणत असेल, आम्ही कृतार्थ झालो ! आम्ही धन्य झालो !!

० ० ०


॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

With Best Compliments from :

**S. P. Jagdish & Co.**

# V. S. Sukthankar Prize Winners


They stood first in the Matric & S.S.C. exam.

| | | |
|---|---|---|
| 1933 | M. Y. Bhide | |
| 1934 | A. D. Rangnekar | |
| 1935 | B. G. Ajinkya | |
| 1936 | G. L. Date (10th in the University) | |
| 1937 | V. P. Bhagwat | |
| 1938 | R. D. Kamat | |
| 1939 | R. M. Patankar | |
| 1940 | S. S. Kulkarni | |
| 1941 | K. B. Paigankar | |
| 1942 | R. W. Paranjape (4th in the University) | |
| 1943 | B. R. Gole, (4th in the University) | |
| 1944 | D. A. Wagle | |
| 1945 | V. G. Pendse | |
| 1946 | R. K. Paradkar | |
| 1947 | K. G. Dolas | |
| 1948 | M. P. Tawde | |
| 1949 | C. Y. Hadkar | |
| 1950 | V. K. Kunte | |
| 1951 | V. D. Kambli | |
| 1952 | V. H. Karmarkar | |
| 1953 | H. S. Kemnaik | |
| 1954 | V. S. Jakkal | |
| 1955 | M. B. Vichare | |
| 1956 | R. M. Dabhade | |
| 1957 | R. R. Pai | |
| 1958 | M. S. Patankar | |
| 1959 | M. R. Joshi | |
| 1960 | R. A. Mashelkar (11th in the S.S.C. Board) | |
| 1961 | M. N. Bhave | |
| 1962 | G. S. Abhyankar (28th in the S.S.C. Board) | |
| 1963 | V. G. Bankar | |
| 1964 | D. V. Toraskar | |
| 1965 | G. M. Sawant | |
| 1966 | S. S. Kharvandikar | |
| 1967 | S. A. Sathe | |
| 1968 | M. N. Bhave | |
| 1969 | F. B. Kalaskar | |
| 1970 | R. D. Pade | |
| 1971 | G. B. Pawar | |
| 1972 | R. J. Patankar | |
| 1973 | R. R. Ponkshe | |
| 1974 | D. M. Pansare | |
| 1975 | G. R. Padalkar | |
| 1975 | P. B. Patwardhan | (New S.S.C.) |
| 1976 | B. G. Chavan | X |
| 1976 | A. D. Salve | XI |
| 1977 | V. B. Karande | X |
| 1978 | U. V. Oak | X |
| 1979 | D. R. Joshi | X |
| 1980 | V. S. Hindalekar | X |
| 1981 | T. V. Talande | X |


इमारत विकत घेतली



डावीकडून उजवीकडे : १) प्रि. स. वि. खरवंडीकर, २) श्री. प्रभाकरपंत जोशी, ३) श्री. श्री. पळशीकर, ४) बटुक मेहता, ५) श्री. गो. के. सावंत ६) न्या. बी. एन्. गोखले, ७) न्या. व्ही. एस्. देसाई, ८) श्री. वा. रा. पाटणकर, ९) डॉ. रेगे १०) क. भा. का. लाड.



न्यू इरा नाईट हायस्कूलचा शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी.



कै. य. म. जुवळे
शाळेचे पहिले पर्यवेक्षक.



सौ. लीलाबाई फडके,
शाळेच्या संस्थापकांपैकी एक.



कै. वि. रा. पाटकर,
शाळचे पर्यवेक्षक



सजविलेल्या वर्गात अल्पोपहार घेताना पदार्थांची
अनोखी चव विद्यार्थ्यांनी चाखली.



असाच सजलेला
वर्ग नेहमी
असता तर ?



श्री. दत्ता सावंत –
अध्यक्ष, स्मरणिका व प्रसिद्धी समिती.